
# राजकीय भूगोल

## घटक २. राजकीय भूगोलातील संकल्पना

# प्रस्तावना:

सदर प्रकरणामध्ये आपण खालील संकल्पना अभ्यासणार आहोत.



# राज्य (State)

**<u>राज्याचा उदय:</u>**

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. त्याच्या सहजीवनातून समाज निर्माण झाला. भटक्या अवस्थेतून तो एकत्र आला. एकत्र आल्याने त्याला आपल्या मुलभूत गरजा भागविता आल्या, सुरक्षितता वाढली. मनुष्य समूहाने राहू लागल्यानंतर सामाजिक संस्था (कुटुंब, विवाह, धर्म) निर्माण झाल्या. या संस्थांद्वारा मनुष्याच्या गरजा पूर्ण होऊ लागल्याने त्याचे या संस्थांशी संबंध वाढत गेले.

मात्र वरील संस्था वेगवेगळ्या व स्वतंत्र असल्याने, त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची गरज भासली. शिवाय मानवाचे प्रश्न सोडविता यावे व जीवन सुखी व्हावे ही त्यामागची कल्पना होती. यातूनच राज्याची (राज्यसंस्था) निर्मिती झाली असावी आणि सामाजशिलतेचा विकास झाला असावा, असे आभ्यासकांचे मत आहे.

परंतु राज्याची निर्मिती केव्हा झाली, हे निश्चित सांगता येत नाही. पण राज्य ही अतिशय प्राचीन संघटना आहे, असे म्हणता येईल.

## <u>राज्य संकल्पना :</u>

‘राज्य’ हे इंग्रजी भाषेतील ‘State’ या शब्दाचे मराठी भाषांतर.

*लॅटिन* भाषेतील ‘status’ पासून ‘state’ शब्द बनला.

काहींच्या मते *इटालियन* भाषेतील ‘stato’ शब्दापासून उत्पत्ती.

तर काहींच्या मते ‘polis’ या *ग्रीक* शब्दातून आलेला आहे.

## व्याख्या (Definition):

**१. ॲरीस्टॉटल -** ‘वेगवेगळ्या कुटुंबांनी आणि गावांनी आपले जीवन परिपूर्ण, सुखी व आनंददायी करण्याच्या हेतूने स्थापन केलेला संघ म्हणजे राज्य होय.’

**२. बोडीन -** ‘समान उद्दिष्टे आणि सर्वश्रेष्ठ सत्ता यांनी नियंत्रित केलेल्या विविध कुटुंबांची संस्था म्हणजे राज्य होय.’

**३. वुड्रो विल्सन -** ‘ठराविक सीमा मर्यादा असलेल्या भूप्रदेशात कायद्याची निर्मिती व त्याचे पालन यासाठी संघटित झालेल्या लोकसमुदायास राज्य म्हणतात.’

**४. प्रोफेसर हेरॉल्ड लास्की -** ‘राज्य म्हणजे शासन (सरकार) आणि शासित (प्रजा) या दोन्ही घटकांत विभागलेला आणि स्वतःस सर्वश्रेष्ठ मानून तेथील संस्थांवर अधिकार (सत्ता) गाजविणारा संघ.’


**५. प्रा.गार्नर -** ‘विशिष्ट भूप्रदेशात कमी-अधिक संख्येने वास्तव्य करणारा, सामान्यतः बाह्य नियंत्रणांपासून मुक्त असलेला आणि शासनाची आज्ञा पाळणारा लोकांचा समाज म्हणजे राज्य.’

**६. मॅकिव्हरे -** ‘राज्य ही विशिष्ट भूप्रदेशात सरकारने मंजूर केलेल्या कायद्यानुसार कार्य करणारी संस्था होय.’

थोडक्यात, राज्य म्हणजे ‘ठराविक सीमा निश्चित असलेला, आंतरराष्ट्रीयदृष्टया त्याच्या सीमा मान्य पावलेला, राजकीयदृष्टया स्वतंत्र व्यक्तीत्व व राष्ट्रीयत्व असलेला लोकसमुदायाचा प्रदेश होय.’

## राज्याची अंगे (घटक) (Elements of State):

राज्यशास्त्रानुसार राज्याच्या निर्मितीसाठी लोकसंख्या, भूप्रदेश, शासनसंस्था व सार्वभौमत्व हे चार घटक आवश्यक. यापैकी एकही घटक नसेल तर राज्याची निर्मिती होऊ शकत नाही.



**१. लोकसंख्या (Population)-** राज्याच्या निर्मितीसाठी हा अतिशय महत्त्वाचा घटक. निर्मनुष्य प्रदेशात राज्य निर्माण होऊ शकत नाही. मुळात राज्याचा उगम हा मानवाच्या सामाजिक प्रवृत्तीतून झाला आहे.

राज्याची लोकसंख्या किती असावी, यासंबंधी प्राचीन ग्रीक विचारवंतांनी तत्कालीन परिस्थितीनुसार विचार केलेला होता. प्लेटोने ५०००, रुसोने १०००० तर अॅरीस्टॉटलने १०,००० ते १,००,००० असावी असे म्हटले होते.

आधुनिक काळात राज्याच्या लोकसंख्येत कमालीची भिन्नता असल्याने संख्यानिदर्शक मत मांडणे योग्य ठरत नाही. राज्याची लोकसंख्या किती असावी, याविषयी निश्चित अशी मर्यादा नाही. मोठ्या लोकसंख्येचे राज्य असू शकते उदा. चीन, भारत, रशिया, सं.संस्थाने इ., तसेच ते कमी लोकसंख्येचेही असू शकते उदा. व्हॅटिकन, मोनॅको, भूतान, पोलंड, बेल्जियम, मालदीव इ.

लोकसमुदायाचा विचार करताना, राज्याच्या सर्व गरजा पूर्ण होऊ शकतील व राज्यापुढे जास्त लोकसंख्येचा गंभीर प्रश्न निर्माण होणार नाही इतकी लोकसंख्या राज्यात असणे योग्य असते.

संख्येबरोबर गुणांनाही महत्त्व. कार्यक्षम, आरोग्यसंपन्न, चारित्र्यवान, बुद्धिमान, समाजानिष्ठ, उद्योगी इत्यादी गुणसंपन्न असेल तर राज्य प्रगतीकडे जाते.

**२. भूप्रदेश (Territory)-** हा सुद्धा महत्त्वाचा घटक असून भूप्रदेश असल्याशिवाय राज्याची निर्मिती होऊ शकत नाही. जेव्हा लोक विशिष्ट सीमा निश्चित असलेल्या भूप्रदेशात वास्तव्य करू लागतात तेव्हाच राज्याची निर्मिती होते.

पूर्वी मनुष्य भटक्या अवस्थेत असताना राज्ये नव्हती पण नंतर विशिष्ट भूप्रदेशात स्थायी वस्ती करून राहू लागल्यावर टोळी राज्ये निर्माण झाली. १९४८ मध्ये इस्त्राईल राज्य निर्माण झाले.

ज्या प्रदेशावर राज्य निर्माण होते, तो संपूर्ण प्रदेश त्या राज्याच्या मालकीचा असतो. समुद्र किनार्यापासून १६ किमी (१० मैल) चा प्रदेश त्या राज्याचा मानला जातो. इतर देशांत आपला वकील ज्या इमारतीत राहतो, ती इमारत व त्या सभोवतीची जागा आंतरराष्ट्रीय विधीनियमाने त्या राज्याची मानली जाते. याला अतिरिक्त प्रादेशिक सत्ता म्हणतात.

राज्याच्या भूप्रदेशात जमिनी, नद्या, तळी, सरोवरे, पर्वत, खनिजे, भूजल संपत्ती इ.चा समावेश.

राज्याकरिता निश्चित असा भूप्रदेश असला तरी क्षेत्रफळ किती असावे याविषयी कोणताही नियम नाही. उदा. रशिया, चीन, कॅनडा मोठे तर मोनॅको (१३ चौकिमी) व व्हॅटिकन (१०० एकर) लहान राज्ये.

ग्रीक तत्वज्ञांनी राज्याचे क्षेत्रफळ फार मोठे असून नये म्हटले कारण प्रगती होत नाही. तसेच फार लहान असू नये कारण संरक्षण, व्यापार, आर्थिक गरजा पुरविण्यासाठी असमर्थ ठरून परावलंबी व परतंत्र होण्याची भीती असते. रुसोच्या शब्दात, राज्याचा कारभार करता येणार नाही इतका मोठा आणि स्वयंपूर्ण होता येणार नाही इतका लहानही नसावा.

**३. शासनसंस्था (Government)-** हाही घटक महत्त्वाचा. समाजाचे संरक्षण, संवर्धन, राज्यातील निरनिराळ्या संस्थांवर नियंत्रण, राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे इ.साठी शासन यंत्रणेची आवश्यकता. शासनाचा व्यापक अर्थ पाहता, त्यात कायदेकारी (Legislative), कार्यकारी (Ececutive) व न्यायकारी (Judiciary) या तीन शाखा असतात. कायदेकारी किंवा विधीमंडळ हे कायदे करते, कार्यकारी मंडळ कायद्याची अंमलबजावणी करते तर न्यायकारी मंडळ न्यायदानाचे कार्य करते. ही तिन्ही कार्ये शासनाकडून केली जातात.

शासन हे देशांतर्गत कार्याबरोबर विदेशी धोरण, आंतरराष्ट्रिय संबंध, व्यापार, पर्यटन इ. देखील कार्ये करते.

राज्यात शासन कोणत्या प्रकारचे असावे हे तेथील संस्कृती, इतिहास, लोकांचे आचारविचार, आर्थिक व सामाजिक स्थिती आणि राजकीय पार्श्वभूमी यावर अवलंबून. उदा. इंग्लंड व भारत लोकतंत्रात्मक, अमेरिकेत अध्यक्षीय, चीन व बल्गेरियात साम्यवादी, पूर्वी इराक हुकुमशाही इ.

**४. सार्वभौमत्व (Sovereignty)-** हा चौथा व महत्वाचा घटक. वरील तिन्ही घटक असून सार्वभौमत्वाशिवाय राज्य निर्माण होऊ शकत नाही. कारण, राज्याला सार्वभौमत्वाची (सार्वभौमसत्ता असण्याची) गरज असते. जोपर्यंत राज्यातील मानवी समुदायास सार्वभौमत्व प्राप्त होत नाही, तोपर्यंत त्यास राज्य ही संज्ञा प्राप्त होऊ शकत नाही. म्हणजे त्या राज्याचे राज्यात रूपांतर होऊ शकत नाही. १९४७ पूर्वी भारताचा प्रदेश व लोक होते, मात्र तेथे इंग्रजीसत्ता होती. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र होऊन, भारतीय लोकांचे सार्वभौमशाली सरकार स्थापन झाले आणि भारताला स्वतंत्र राज्याचा दर्जा प्राप्त झाला. म्हणून सार्वभौम सत्ता हा 'राज्याचा आत्मा' (Soul of the state) असतो.

सार्वभौमत्व किंवा सार्वभौम सत्ता म्हणजे राज्याचे स्वतंत्र प्रभुत्व. याचाच अर्थ असा की, राज्यातील लोक, संस्था व संघटना यांच्यावर राज्याच्या सत्तेचे नियंत्रण असणे आणि अशा सत्तेवर बाहेरील कोणत्याही देशाचे नियंत्रण नसणे होय. म्हणून राज्यातील सर्वश्रेष्ठ संस्था यादृष्टीने ही सत्ता निर्णय देऊ शकते, तसेच नियंत्रणही ठेवू शकते. सार्वभौम सत्ता ही अंतिम सत्ता असते. तिच्यावर बाहेरील कोणत्याही राज्याचा दबाव असत नाही.

एकूण- 'राज्याच्या अंतर्गत कारभारात सर्वश्रेष्ठ असणारी आणि बाहेरील देशांच्या नियंत्रणापासून स्वतंत्र असणारी, अशी सत्ता म्हणजे सार्वभौम सत्ता होय.'

## राज्य निर्मितीचे भौगोलिक घटक (राज्यावर परिणाम करणारे घटक):

राज्याच्या दृष्टीने भूप्रदेशाची भौगोलिक परिस्थिती महत्त्वाची असते. कारण, भौगोलिक परिस्थितीचा राज्यावर परिणाम होतो. व्हलकन बर्ग या तज्ज्ञानेही राज्याच्या प्राकृतिक घटकांवर भर दिला आहे. यात राज्याचे स्थान, राज्यविस्तार, तेथील भूरचना, हवामान, नैसर्गिक वनस्पती, साधनसंपत्ती, लोकसंख्या, वाहतूक व दळणवळण या घटकांचा समावेश होतो. हे घटक अनुकूल असल्यास राज्य बळकट व सामर्थ्यवान बनते; ते प्रतिकूल असल्यास ते कमकुवत बनते.

### I. भौगोलिक घटक:

**१) स्थान (Location)-** राज्याच्या स्थानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कोणत्याही राज्याच्या भौगोलिक स्थानाचे ३ प्रकार पडतात.

अ) खगोल शास्त्रीय स्थान, ब) जलाशय व भूखंडाच्या संदर्भात स्थान, क) परस्पर सान्निध्याचे स्थान

**अ) खगोल शास्त्रीय स्थान (Astronomical Location):** हे स्थान अक्षवृत्त व रेखावृत्ताच्या संदर्भात सांगितले जाते. जसे, कमी अक्षांशातील व जास्त अक्षांशातील स्थान, कमी अक्षांशातील स्थान हे उष्ण कटिबंधीय, तर जास्त अक्षांशातील स्थान हे शीत कटिबंधीय स्वरूपाचे असते. ही स्थाने राज्यास तितकी अनुकूल नसतात. उदा. इंडोनेशियाचे कमी अक्षांशावरील स्थान व ग्रीनलँडचे जास्त अक्षांशावरील स्थान. याशिवाय मध्यअक्षवृत स्थान असाही एक प्रकार आहे. राज्याचे मध्यअक्षवृत्तातील समशीतोष्ण कटिबंधीय स्थान हे अनुकूल समजले जाते. उदा. फ्रान्स व जर्मनीचे स्थान.

**ब) जलाशय व भूखंडाच्या संदर्भात स्थान (Location in relation to water bodies and landmasses):** याचे खालील प्रमाणे दोन प्रकार पडतात.

**i) सागरी स्थान (Maritime location):** राज्यास समुद्र किंवा महासागराचे सान्निध्य लाभले असल्यास, त्यास 'सागरी स्थान' (Maritime location) म्हणतात. अशा देशाच्या चार, तीन, दोन किंवा एका बाजूस समुद्र असतो.

उदा. ग्रेट ब्रिटन व जपानच्या सर्व बाजूंनी, भारत व कॅनडाच्या तीन बाजूंनी, सं. अमेरिका व मेक्सिको या देशांच्या दोन बाजूंनी आणि चिली व पाकिस्तान या देशांच्या एका बाजूना समुद्र आहे. सागरी स्थानाचा राज्याच्या सांस्कृतिक व राजकीय स्थितीवर परिणाम होतो.

राजकीय दृष्टीने विचार करता, लष्करी डावपेचांच्या दृष्टीने सागरी स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. उदा. सागरी स्थानामुळे ग्रेट ब्रिटनने आपल्या सागरी सामर्थ्याच्या बळावर जगात आपले साम्राज्य निर्माण केले होते. सागरी स्थानाचा व्यापारावरही मोठा परिणाम होतो. दंतूर व खोल समुद्रकिनाऱ्यामुळे बंदराचा विकास होऊन, जलवाहतुकीची प्रगती होते व त्यामुळे राज्याचे इतर राज्यांशी व्यापारी संबंध प्रस्थापित होऊन, व्यापाराची प्रगती होते.

सागरी स्थानामुळे ग्रेट ब्रिटन, जर्मनी, जपान इत्यादी देशांच्या विदेशी व्यापारात मोठी वाढ झाली आहे. सागरी स्थानामुळे मासेमारी व्यवसायाची प्रगती होते. कॅनडा, नॉर्वे इत्यादी देशांच्या समुद्रकिनाऱ्यांलगत याच कारणाने मासेमारी व व्यापाराची प्रगती झालेली आहे. सागराचा हवामानावरही परिणाम होतो. सागरी स्थान असलेले हवामान सम असते. हे हवामान मानवी जीवनास अनुकूल असते. या हवामानाचा उद्योगधंद्यावर अनुकूल परिणाम होतो. उदा. ग्रेट ब्रिटन व जपान.

**ii) भूखंडीय स्थान (Cotinental location):** समुद्राचे कोणत्याही प्रकारचे सान्निध्य नसलेले (समुद्रापासून दूर) व खंडांतर्गत भागात असलेल्या राज्याचे स्थान हे खंडीय स्वरूपाचे (continental) असते. जगातील अनेक देशांचे स्थान याप्रकारचे आहे. उदा. नेपाळ, भूतान, हंगेरी, स्वित्झर्लंड, मंगोलिया इत्यादी.

खंडीय स्थान राज्याच्या विकासाच्या दृष्टीने अनुकूल नसते. या राज्यांस समुद्रकिनारा लाभला नसल्याने, विदेशी व्यापारासाठी या राज्याला दुसऱ्या देशावर विसंबून राहावे लागते. म्हणून व्यापारीदृष्ट्या हे देश मागासलेले असतात. या देशांशी चालणारा बहुतांश व्यापार खुश्कीच्या मार्गाने होतो. खंडीय स्थान असलेले देश औद्योगिक दृष्ट्याही मागासलेले असतात. या देशांत पर्यटनाची विशेष प्रगती होत नाही. या देशांच्या सीमा कृत्रिम असल्याने, त्यांना संरक्षणावर जास्त खर्च करावा लागतो. या देशांचे हवामान विषम स्वरूपाचे असते. समुद्रापासून दूर असल्याने या देशांत पर्जन्याचे प्रमाण कमी असते.श्रीलंका हे ९ देश आहेत. हंगेरीला युक्रेन, रुमानिया, युगोस्लाव्हिया, क्रोएशिया, ऑस्ट्रिया, स्लोव्हाकिया या देशांच्या सीमा आणि सिरियाला तुर्कस्थान, इराक, जॉर्डन, इस्त्रायल व लेबनॉन या ५ देशांच्या सीमा आहेत.

**क) परस्पर सान्निध्याचे स्थान (Vicinal Location):** अनेक देशांचे सान्निध्य (शेजार) लाभलेल्या राज्यांचे (देशांचे) स्थान हे या प्रकारचे असते. या स्थानामागे मानवी घटक प्रमुख असतो. कृत्रिम सीमांमुळे राज्यास असे स्थान प्राप्त होते. अनेक देशांचा शेजार लाभलेल्या देशाचे स्थान त्या देशाच्या दृष्टीने बरोबर नसते. ते गुंतागुंतीचे असल्याने, त्या देशाला शेजारच्या देशांतील संघर्षाला नेहमी तोंड द्यावे लागते. भारताचे स्थान अशा प्रकारचे आहे. भारताच्या शेजारी पाकिस्तान, अफगाणिस्तान, ताजिकीस्थान, चीन, नेपाळ, भूतान, म्यानमार, बांगला देश, श्रीलंका हे ९ देश आहेत. हंगेरीला युक्रेन, रुमानिया, युगोस्लाव्हिया, क्रोएशिया, ऑस्ट्रिया, स्लोव्हाकिया या देशांच्या सीमा आणि सिरियाला तुर्कस्थान, इराक, जॉर्डन, इस्त्रायल, लेबनॉन या ५ देशांच्या सीमा आहेत.

**२) आकार (Size):**

**अ) मोठा आकार:** राजकीय घटक म्हणून राज्याच्या आकाराला महत्त्व आहे. राज्याचा आकार समाधानकारक पाहिजे. तो फार जास्त किंवा फार कमी नसावा. जगातील अनेक देशांचा आकार मोठा आहे. उदा. रशिया, चीन, कॅनडा, ब्राझील, ऑस्ट्रेलिया.

क्षेत्रफळाने मोठ्या असलेल्या देशांत सर्वत्र समान आर्थिक विकास होत नाही. अशा देशांच्या थोड्या भागात औद्योगिक व इतर प्रगती झालेली असते. शिवाय जास्त लोकसंख्येमुळे तेथील साधनसंपत्ती अपुरी पडते. ऑस्ट्रेलिया याचे उत्तम उदाहरण आहे. या देशाचा ५० % भाग वाळवंटी असून, देशाच्या मर्यादित भागात आर्थिक विकास झालेला आहे. रशिया, चीन, कॅनडा व ब्राझील या देशांचेही मोठे भाग अविकसित आहेत.

**ब) लहान आकार:** अतिशय लहान आकाराचे राज्यही चांगले नसते. अशा देशात मर्यादित साधनसंपत्ती असते. या देशाची आर्थिक प्रगती झालेली नसते. संरक्षणाच्या दृष्टीने हे देश कमकुवत असतात. अनेक बाबतीत ते इतर देशांवर अवलंबून असतात. युरोपातील अंडोरा व मोनॅको हे देश आकाराने अत्यंत लहान आहेत.

**क) मध्यम आकार:** आकाराचा विचार करता, मध्यम आकाराचे देश उत्तम असतात. अशा देशात शेती, उद्योगधंदे, दळणवळण व व्यापाराची प्रगती झालेली आढळते. ग्रेट ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स व इतर अनेक देश या आकाराचे आहेत.

**३) बाह्यरूप (बाह्याकृती) (Shape):** राज्याची बाह्य आकृती किंवा बाह्य घडण म्हणजेच त्याचे रूप (Shape) होय. हे बाह्यरूप त्याच्या घडणीवर अवलंबून असते. राज्याचे बाह्यरूपही महत्त्वाचे असते.

राज्याचे बाह्यरूप हे एकसंघ (Compact), विखंडित (Broken), तुटलेले (Fragmented) व विखुरलेले (Scattered) असे चार प्रकारचे असते.

**अ) एकसंध:** एकसंघ रूप म्हणजे राज्याचा एक सलग असा भाग. राज्याच्या दृष्टीने हे सर्वोत्तम असते. फ्रान्स याचे उत्तम उदाहरण आहे. स्वित्झर्लंड, रूमानिया व हंगेरीदेखील एकसंघ रूप असलेले देश आहेत.



**ब) विखंडित :** विखंडित म्हणजे एक किंवा दोन भाग राज्याच्या मुख्य भूप्रदेशापासून अलग झालेले रूप होय. स्वातंत्र्यानंतर पाकिस्तानची आकृती अशा प्रकारची (पूर्व पाकिस्तान - सध्याचा बांगला देश व पश्चिम पाकिस्तान) होती. प्रशासनाच्या दृष्टीने हे बरोबर नसते.



**क) तुकडे नुमा (भूप्रदेश):** भूप्रदेश (देश) अनेक भागांत विभागला असेल, तर त्याचा तिसऱ्या प्रकाराच्या (Fragmented shape) रूपात समावेश होतो. हेदेखील प्रशासनाच्या दृष्टीने बरोबर नसते. यात सर्व भागाशी संपर्क साधणे कठीण होते. अशा देशांच्या सर्व भागांत समान विकास होत नाही. इंडोनेशिया, फिलिपाईन्स, हे असे देश आहेत.






**ड) विखुरलेली स्थिती :** जेव्हा देशाचे विविध भाग जगात सर्वत्र विखुरलेले असतात, तेव्हा त्या देशाचे स्वरूप हे विखुरलेल्या रूपाचे असते. दुसऱ्या महायुद्धापर्यंत ब्रिटिश साम्राज्य जगभर विखुरलेले होते. सध्या सं. अमेरिकेची स्थिती काहीशी अशी आहे. या देशाचा अलास्का हा प्रदेश या देशापासून दूर कॅनडाच्या ईशान्येस, तर पॅसिफिकस्थित हवाई बेटे देशापासून अतिशय दूर आहेत.





**४) भूरचना (Topography):** पर्वत, पठारे, मैदाने व दऱ्या या भूवैशिष्ट्यांमुळे राज्याची वेगवेगळी किंवा एकत्रित भूरचना बनते. राज्याच्या राजकीय भूगोलाचा एक घटक म्हणून भूरचनेचा राज्याच्या अंतर्गत गोष्टीवर परिणाम होतो. शिवाय काही ठिकाणी सरहद्दी (Boundary) निश्चित करण्यासाठी भूवैशिष्ट्यांचा उपयोग होतो. भूरचनेचा राज्याच्या संस्कृती आणि आर्थिक संरचनेवर मोठा प्रभाव पडतो.

**अ) मैदाने (Plains):** भूवैशिष्ट्यात मैदानांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. अनुकूल हवामान असलेल्या मैदानी प्रदेशात आर्थिक व सामाजिक प्रगती होते. इतर कोणत्याही प्रदेशापेक्षा मैदानी प्रदेश मानवी वसाहती व सांस्कृतिक विकासाकरिता अनुकूल असतात. म्हणून जगातील मैदानी प्रदेशात दाट लोकवस्ती असून, तेथे आर्थिक, सामाजिक व राजकीय क्रिया मोठ्या प्रमाणात चालत असलेल्या आढळतात.

सौम्य मैदानी प्रदेशात जंगले नद्या सरोवरे व दलदलीचे भाग नसतील, तर तेथे वाहतुकीच्या साधनांची मोठ्या प्रमाणात प्रगती होते. या प्रदेशात दळणवळणही सुलभ होते. म्हणून मैदानी प्रदेशात शेती, उद्योगधंदे, व्यापार, खेडी व शहरांची प्रगती होते. उदा. उत्तर भारताचे मैदान, पूर्व चीनचे मैदान अमेरिकेतील प्रेअरीचे मैदान व जगातील इतर मैदानी प्रदेश.

मैदाने ही सर्व दृष्टीने महत्त्वाची असली, तरी मैदानातील वाहतुकीमुळे, युद्धकाळात सैन्यांच्या होणाऱ्या संचारामुळे शांतता भंग होऊ शकते.

**ब) पर्वत व पठारे (Mountains and Plateaus):** पर्वत व पठारांनाही राजकीय भूगोलाच्या अध्ययनात महत्त्व आहे. कारण, यांचाही राजकीय गोष्टीवर परिणाम होतो. जेथे उंच पर्वतामुळे राज्यास सुरक्षितता मिळते, तेथे नैसर्गिकरीत्या राजकीय घटकाचा (Political unit) जन्म होतो, अशी राज्ये जेव्हा वाढून प्रौढावस्थेत येतात, तेव्हा ते पर्वतापलीकडे राज्याचा विस्तार करतात. जसे दक्षिण अमेरिकेत व्हेनेझुएला, कोलंबिया व इक्वेडोर आणि मध्य पूर्वेतील तुर्कस्तान व इराण या देशांनी पर्वतापलीकडे समुद्रकिनाऱ्यापर्यंत विस्तार केला आहे.

राज्यातील उंच पर्वतीय प्रदेश बऱ्याच ठिकाणी वनसंपत्ती व खनिज संपत्तीची आगारे असतात. याचा आर्थिक लाभ त्या राज्याला होतो. उदा. आफ्रिका व दक्षिण अमेरिकेतील बऱ्याच देशात वनसंपत्ती विपुल असून, तेथे विविध खनिजेही मोठ्या प्रमाणात सापडतात.

पर्वत व पठाराचे काही फायदे असले, तरी अशी भूरचना असलेल्या भागात वाहतुकीचे अडथळे येतात. अशा भागात शेतीची प्रगती होत नाही. जास्त उंची व तीव्र उतार यामुळे तेथील व्यापार व पर्यटन यावरही परिणाम होतो. म्हणून असे भाग विरळ लोकवस्तीचे असतात. अशा उंचवट्याच्या भागात राष्ट्रीय एकात्मता निर्माण होण्याऐवजी प्रादेशिक भिन्नता निर्माण होते. अशा भागातील लोकांत संघर्ष होण्याची संभावना असते. उदा. पर्वतांनी व्यापलेल्या स्वित्झर्लंडमध्ये अनेक वेळा प्रादेशिक भिन्नतेमुळे यादवी युद्ध झाले आहे. तरी जगात काही गिरीराज्ये (देश) (Mountain states) अस्तित्वात आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे स्वित्झर्लंड (आल्पस पर्वत), तसेच युरोपातील अंडोरा (पिरेनीज पर्वतश्रेणीत) आणि हिमालय पर्वतश्रेणीत स्थित असलेले नेपाळ व भूतान.

**५) जलाशय (Water bodies):** जलाशयात समुद्र, महासागर, नद्या, तळी व सरोवरांचा समावेश होतो.

समुद्र व महासागरांचे सान्निध्य लाभलेल्या देशांचे स्थान महत्त्वाचे असते. समुद्रकिनारा दंतूर व खोल असल्यास बंदराची निर्मिती होऊन, व्यापाराची प्रगती होते. समुद्रकिनारा असल्यास त्या राज्यात मासेमारीचा विकास होतो. तसेच, समुद्रसान्निध्यामुळे हवामान सम राहण्यास मदत होते. लष्करी डावपेचाच्या दृष्टीने समुद्रांना महत्त्व असते. म्हणून ज्या देशांना विस्तृत समुद्रकिनारा लाभलेला आहे, असे देश प्रगती करतात. उदा. सं. संस्थाने, ग्रेट ब्रिटन, जर्मनी, जपान, भारत इत्यादी.

नद्या, तळी व सरोवराचे पाणी गोड असते. या जलाशयाच्या पाण्याचा उपयोग पिण्यासाठी, तसेच शेती, उद्योगधंदे, वीजनिर्मिती इत्यादीसाठी होतो. नद्यांमुळे जमीन सुपीक बनते ; म्हणून जेथे नद्या मोठ्या प्रमाणात असतात, तेथे शेती व उद्योगधंद्यांची प्रगती होते. उदा. सं. संस्थाने, चीन इत्यादी देश. नद्यांच्या खोऱ्यात दाट लोकवस्ती असते. असे भाग सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय गोष्टींची क्षेत्रे बनतात.

**६) हवामान (Climate):** मानवाचे जीवन वेगवेगळ्या प्रकारे हवामानाशी संबंधित आहे. मनुष्य जी खाद्यान्ने निर्माण करतो, त्यावरही हवामानाचा प्रभाव पडतो. सांस्कृतिक वैशिष्ट्यांच्या निर्मितीत हवामानाचे कार्य महत्त्वाचे असते. म्हणून अनुकूल हवामानाच्या प्रदेशातील देशांची प्रगती झालेली आढळते. यामुळे जगातील प्रगत देश हे समशितोष्ण हवामानाच्या प्रदेशात आढळतात.

हवामानाच्या प्रकारांचा विचार करता, अतिथंड किंवा अतिउष्ण हवामान देशाच्या प्रगतीसाठी अनुकूल नसते. येथे शेती, उद्योगधंद्ये, व्यापार व वाहतुकीची प्रगती होत नाही. म्हणून अशा देशांत लोकसंख्या अतिशय कमी असते. उदा. ग्रीनलंड हा देश अतिथंड असून, आफ्रिकेतील चाड हा देश उष्ण आहे. प्रतिकूल हवामानामुळे हे देश आर्थिक व राजकीयदृष्ट्या मागासलेले आहेत.

मात्र, अपवादात्मक प्रतिकूल हवामानाच्या काही देशांत आर्थिक विकास झालेला आढळतो. उदा. मध्यपूर्वेतील इराण, इराक, कुवेत, सौदी अरेबिया या देशांत खनिज तेलाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते ; म्हणून या देशांना राजकीयदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले आहे. याच कारणाने अमेरिका व ब्रिटन हे या देशांवर आपले राजकीय वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न करतात.

अनुकूल हवामान असलेल्या देशात दाट लोकवस्ती असते. येथे शेती, उद्योगधंदे, वाहतूक व व्यापाराची प्रगती झालेली आढळते. अशा देशांत सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय प्रगती झालेली आढळते. म्हणून समशितोष्ण हवामानातील देश जास्त प्रगत आहेत. उदा. जपान, जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स इत्यादी देशांत भूमध्यसागरी व मोसमी हवामानही अनुकूल असल्याने अशा देशांचा विकास झालेला आहे. उदा. इटली हा भूमध्यसागरी हवामानाचा देश र भारत हा मोसमी हवामानाचा देश, हे दोन्ही देश प्रगत आहेत.

## आर्थिक व मानवी घटक:

**१) साधनसंपत्ती (Resources):** राज्याच्या दृष्टीने साधनसंपत्तीला महत्त्व असते. मृदा, जल, वन व खनिज संपत्ती ही महत्त्वाची साधनसंपत्ती ठरते.

**अ) मृदा (Soil):** राज्याच्या दृष्टीने मृदेला महत्त्व आहे. मृदेवर शेतीचा विकास अवलंबून असतो. अशा भागात अन्नधान्याचे उत्पादन होते. सुपीक जमीन असलेले देश समृद्ध समजले जातात. असे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण असतात. उदा. भारत, चीन इत्यादी कृषिप्रधान देश.

**ब) जलसंपत्ती (Water Resources):** देशातील जलसंपत्ती महत्त्वाची असते. जेथे भरपूर पाऊस पडतो, तेथे विपुल पाणी असते. त्यामुळे अशा देशांत शेती, जलसिंचन, जलविद्युत उद्योगधंदे यांचा विकास होतो. सं. संस्थाने, कॅनडा वगैरे देशांत जलसंपत्ती विपुल असल्याने या देशांनी प्रगती केलेली आहे.

**क) वनसंपत्ती :** वने ही राष्ट्राची मोठी संपत्ती मानली जाते. वनसंपत्तीचे आर्थिक व पर्यावरणीय दृष्टिकोनातून खूप महत्त्व आहे. यादृष्टीने देशाचा ३३ % भाग हा वनाखाली असला पाहिजे. नॉर्वे, स्विडन, फिनलँड या देशांत जंगलाचे प्रमाण जास्त आहे. वाळवंटी देशांत वनसंपत्ती अत्यंत कमी असते.

**ड) खनिज संपत्ती (Mineral Resources):** देशातील खनिज संपत्ती अत्यंत महत्त्वाची असते ; पण खनिजे (Minerals) व उर्जा साधने (Power Resources) यांचा समावेश होतो. खनिज संपत्तीवर देशाचा औद्योगिक विकास अवलंबून असतो. ज्या देशांत खनिज संपत्ती जास्त असते, अशा देशांनी औद्योगिक क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. उदा. सं. संस्थाने, जर्मनी, फ्रान्स, ग्रेट ब्रिटन, रशिया, जपान, भारत इत्यादी. ज्या देशांत खनिज संपत्तीचा अभाव आहे. असे देश मागासलेले ठरतात. जगात असे अनेक देश आहेत.

खनिजे आर्थिकदृष्ट्या महत्त्वाची तर असतातच, शिवाय ती राजकीयदृष्ट्याही महत्त्वाची असतात ; म्हणून खनिज क्षेत्रावर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा मोठ्या देशाचा उद्‌देश असतो. उदा. मध्य पूर्वेतील तेल क्षेत्रांना राजकीयदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले आहे. म्हणून मध्यपूर्वेतील राजकीय संघर्षामागे येथील तेलक्षेत्रे आहेत.

**२) लोकसंख्या (Population):** लोकसंख्या हा राज्याचा महत्त्वाचा मानवी घटक आहे. कोणतेही राज्य लोकसंख्येशिवाय निर्माण होऊ शकत नाही. एखाद्या भूप्रदेशावर जेव्हा लोकसमुदाय वास्तव्य करतो, तेव्हाच राज्य निर्माण होते. अर्थात, लोकसंख्या किती असली पाहिजे, यासाठी राजकीय किंवा कोणताही नियम नाही. जगात अंडोरा, व्हॅटिकनसारखी कमी लोकसंख्येची राज्ये आहेत, तर चीन व भारतासारखी प्रचंड लोकसंख्येचीही राज्ये आहेत.

लोकसंख्या ही राष्ट्राची संपत्ती असते. यावर शेती, उद्योगधंदे व देशाचे लष्करी वळ अवलंबून असते. त्यामुळे देशाची लोकसंख्या एवढी कमी असू नये की, ज्यामुळे तो कमकुवत व परावलंबी बनेल. त्याचबरोबर ती खूप असून नये की, ज्यामुळे देशाच्या साधनसंपत्तीवर, आर्थिक विकासावर ताण पडेल. कॅनन या तज्ज्ञाच्या मते, देशाची लोकसंख्या युक्त (Opti mum) असावी. संख्येपेक्षा देशातील लोकसंख्येची गुणवैशिष्ट्ये महत्त्वाची असतात. आरोग्यक्षम, कार्यक्षम, बुद्धिमान लोक देशात असल्यास, त्या देशांची प्रगती होते. अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, अपान इत्यादी देशांच्या प्रगतीमागे तेथील हुशार, होतकरू, उत्साही व बुद्धिमान लोकही आहेत.

**३) वाहतूक व दळणवळण (Transportation and Communication):** माणसाच्या शरीरात ज्याप्रमाणे रक्तवाहिन्यांचे कार्य चालते, त्याप्रमाणे देशात वाहतूक व दळणवळणाचे कार्य चाललेले असते. यात रस्ते, लोहमार्ग, जल व हवाईमार्ग, तारायंत्र, दूरभाष व दूरदर्शन यांचा समावेश होतो. देशाच्या प्रगतीसाठी वाहतूक व दळणवळण आवश्यक असते.

वाहतुकीद्वारे कच्च्या व पक्क्या मालाची, तसेच प्रवाशांची वाहतूक होते. त्यामुळे शेती, खाणकाम, उद्योगधंदे व व्यापाराला चालना मिळते. नैसर्गिक आपत्तीच्यावेळी (पूर, वादळ, भूकंप, रोगराई, आगी इ.) लोकांना मदत पोहोचविण्यास वाहतुकीच्या मार्गाचा उपयोग होतो. युद्धकाळात वाहतुकीच्या साधनांचे व संदेशवहनाचे कार्य अनन्यसाधारण असते. म्हणून जेथे वाहतुकीच्या मार्गाचे व संदेशवहनाचे जाळे असते, त्या देशाची प्रगती होते. जेथे ही साधने अपुरी असतात, ते देश मागासलेले असतात. जगात असे देश बरेच आहेत.

# राष्ट्र (Nation)

कुठेही राज्य निर्माण होण्यापूर्वी राष्ट्र निर्माण होते. जेव्हा लोकांत एकतेची भावना निर्माण होते, तेव्हा राष्ट्राची निर्मिती होते. म्हणून राज्याचा अभ्यास करताना, राष्ट्राचाही अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो. यादृष्टीने राष्ट्राची संकल्पना, त्याचे घटक यांची माहिती पाहणे जरुरीचे आहे.

**राष्ट्राची संकल्पना (राष्ट्र म्हणजे काय ?)-**

Nation (ज्याला आपण मराठीत राष्ट्र म्हणतो) हा शब्द Natus ह्या लॅटिन शब्दापासून बनला आहे. याचा अर्थ जन्म किंवा वंश असा होतो. म्हणजे एकाच वंशात जन्मलेले, असा त्याचा अर्थ आहे.

बर्जेस व लिकॉक या तज्ज्ञांच्या मते, जेथे समान वंशाचे लोक एकत्र राहतात, तेव्हा त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची, राष्ट्रप्रेमाची, एकतेची व सलोख्याची भावना असते. यातूनच राष्ट्राची निर्मिती होते, असे या विचारवंतांचे मत आहे. या विचारवंतांनी समान वंशाच्या आधारे राष्ट्राची व्याख्या केली आहे.

**१) प्रा. बर्जेस-** ‘वांशिक ऐक्य असलेला व एकाच भौगोलिक प्रदेशात वास्तव्य करणारा लोकसमूह म्हणजे राष्ट्र होय.’

**२) डॉ. लिकॉक -** ‘समान वांशिक असलेला मानवसमूह म्हणजे राष्ट्र होय.’

प्रा. बर्जेस व डॉ. लिकॉक या अभ्यासकांनी वांशिक एकता हा आपल्या व्याख्येचा आधार मानला आहे. जगातील अधिकांश राष्ट्रे याच आधारे निर्माण झाली. या तज्ज्ञांच्या मते, राष्ट्राच्या निर्मितीत वांशिक एकतेची भावना महत्त्वाची असते. अपवादात्मक जगातील काही देश संमिश्र वंश असलेले आहेत. तसेच, त्यांच्यात वेगवेगळी भाषा, धर्म, संस्कृति असली, तरी समान परंपरा व विविधतेतून असलेली एकात्मतेची भावना यांतूनही राष्ट्राची निर्मिती होते. भारत हे याचे उदाहरण आहे. काही इतर व्याख्या

**3) प्रा. बार्कर -** ‘जेव्हा एखादा लोकसमुदाय स्वत:ला आपण राष्ट्र आहोत, असे मानतो, तेव्हा राष्ट्राची निर्मिती होते’.

**4) प्रा. गार्नर -** ‘सांस्कृतिक एकात्मता असलेला सामाजिक समूह म्हणजे राष्ट्र’.

**5) हॅसर-** ‘समान वंश व भाषा यांमुळे नव्हे, तर लोकांच्या एकत्रित व सहजीवनातून निर्माण झालेली ऐक्याची भावना म्हणजे राष्ट्र’.

**6) आर. मुईर-** मुईर या तज्ज्ञाने राष्ट्राचा अर्थ विश्लेषणाद्वारे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. मुईरच्या मते जेव्हा एकाद्या प्रदेशातील लोक वर्षानुवर्षे आनंदाने एकत्र राहतात, तेव्हा त्यांच्यात प्रेम, आपुलकी व जिव्हाळ्याची भावना निर्माण होते. हे लोक नंतर एकमेकांपासून विभक्त होण्यास तयार नसतात. स्वच्छंदपणे राहणे त्यांना आवडते; म्हणून ते इतर देशांच्या गुलामगिरीत राहू इच्छित नाहीत. अशी भावना जेव्हा लोकांत निर्माण होते, तेव्हा मुईरने त्यास राष्ट्र म्हटले आहे.

थोडक्यात, ‘एखाद्या प्रदेशातील लोकसमुदायात जेव्हा ऐक्याची भावना निर्माण होते, तेव्हा त्यास राष्ट्र म्हणतात.’

वरील व्याख्यात ज्या एकात्मतेच्या व ऐक्याच्या भावना आहेत, त्या एखाद्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या त्या भूप्रदेशासंबंधी आहेत. तेथील प्राकृतिक परिस्थितीचा त्यावर परिणाम झालेला आहे. हा त्यामागील अभिप्रेत अर्थ आहे.

## राष्ट्राच्या निर्मितीस आवश्यक घटक:

कोणत्याही प्रदेशात राष्ट्र निर्माण होण्यासाठी तेथील लोकसमुदायात काही समान गोष्टी आवश्यक असतात. त्यात भाषा, वंश, धर्म, संस्कृती, इतिहास, परंपरा इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. ह्या सर्व गोष्टी भूप्रदेशाशी संबंधित आहेत.

**१) भाषा (Languages)-** भाषा हा सर्वांना एकत्र आणणारा महत्त्वाचा घटक आहे. समान भाषा बोलणारे लोक जेव्हा एकत्र येतात, तेव्हा त्यांच्यात ऐक्य निर्माण होऊन, राष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न होते ; परंतु काही वेळा विविध भाषा बोलणाऱ्या लोकांतही राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होते. उदा. स्वित्सर्लंडमध्ये जर्मन, फ्रेंच व इटालीयन ह्या तीन भाषा बोलल्या जातात. १९४७ पूर्वी भारत ब्रिटिशांच्या अंमलाखाली होता, तरीही भारतात विविध भाषा बोलणाऱ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना होती.

**२) वंश (Race)-** वंश, वर्ण हाही राष्ट्र निर्मितीतील एक घटक मानला जातो. समान गुणवैशिष्ट्ये दर्शविणाऱ्या मानवजातीच्या समूहास मानववंश असे म्हणतात. जगात विविध वंशाचे लोक आढळतात. भौगोलिक परिस्थितीनुसार त्यांच्यात ही गुणवैशिष्ट्ये आलेली आहेत. एकाच वंशाच्या लोकांत एकता निर्माण होऊन, त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होते. उदा. मंगोलीयन वंशाचे लोक. वांशिक ऐक्याच्या आधारे त्यांचा देश मंगोलीया हा आहे.

**३) धर्म (Religion)-** समान धर्म असलेल्या लोकांत राष्ट्रीयत्वाची भावना लवकर निर्माण होते. राष्ट्र व राज्याच्या निर्मितीत धर्म हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. उदा. इंडोनेशिया, पाकिस्तान ही मुस्लीम राष्ट्रे आहेत. गेल्या काही वर्षांपर्यंत नेपाळ हे जगातील एकमेव हिंदू राष्ट्र होते. परंतु, जगातील काही राष्ट्रे भिन्न धर्मियांची आहेत. उदा. चीन, रशिया व भारतात अनेक धर्म असूनही, त्यांचे राष्ट्र एक आहे.

**४) संस्कृति (Culture)-** ज्यांची संस्कृति एक आहे, ज्यांचा इतिहास समान आहे आणि ज्यांची परंपरा एक आहे अशा लोकांत ऐक्य भावना निर्माण होते. अशा लोकांचे राष्ट्र असते.

**५) समान राजकीय आकांक्षा व समान हितसंबंध (The same political aspirations & interests)-** विविध धर्मांचे व वंशांचे आणि विविध भाषा बोलणारे लोक समान राजकीय आकांक्षेच्या निमित्ताने एकत्र येतात. उदा. देशावर परकीयांचा हल्ला झाल्यास, त्यास प्रतिकार करण्यासाठी हे लोक संघटित होऊन त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होते. उदा. स्वातंत्र्यलढ्याच्या वेळी भारतातील विविध धर्मांच्या व भिन्न भाषा बोलणाऱ्या लोकांत राष्ट्रीयत्वाची भावना होती.

**६) भौगोलिक एकता (Geographical Unity)-** एका विशिष्ट प्रदेशात अनेक वर्षे वास्तव्य करून राहिल्यावर, हा प्रदेश माझा आहे, ही भूमी माझी मातृभूमी आहे आणि या भूमीवर राहणारे आपण एक आहोत, अशी ऐक्याची भावना तेथील लोकांत निर्माण होऊन, त्यांच्यातील राष्ट्रीयत्व दृढ होते. परंतु, जगाच्या निरनिराळ्या भागात राहूनही, ज्यू लोकांत प्रखर राष्ट्रीय भावना होती. तथापि, सलग एकाच भौगोलिक प्रदेशात राहिल्याने निश्चितपणे तेथील लोकांत राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होते, हे महत्त्वाचे आहे ; ज्यू त्यास अपवाद आहेत.

# राज्य-राष्ट्र संकल्पना (The concept of State-Nation)

राज्य-राष्ट्र संकल्पनेचा आपण जेव्हा विचार करतो, तेव्हा राष्ट्राविषयी आपण प्रथम विचार केला पाहिजे. कारण, राष्ट्र निर्मितीनंतर राज्याची निर्मिती होत असते.

एखाद्या भूप्रदेशात अनेक वर्षे राहात आलेल्या लोकसमूहाच्या मनात आपण सर्व एक आहोत, आपली परंपरा, आपला इतिहास एक आहे, आपले भवितव्य एक आहे याची जाणीव होते, तेव्हा लोकांत परस्परांविषयी आत्मीयता निर्माण होते. त्यांच्या मनात प्रदेशाविषयी प्रेम व आपुलकी निर्माण होऊन, त्याविषयी त्यांना अभिमान वाटतो आणि एकूणच त्यांच्यात एकात्मतेची भावना निर्माण होऊन, त्यांना आपले स्वत: चे स्वतंत्र राज्य असावे, असे वाटू लागते, तेव्हा त्या प्रदेशातील जनसमूहास 'राष्ट्र' (Nation) असे म्हणता येईल.

राष्ट्राची निर्मिती ही मुख्यत्वेकरून भाषा, वंश, धर्म, परंपरा, संस्कृती, इतिहास आणि भौगोलिक एकतेतून होते. समान भाषा, समान धर्म, वांशिक ऐक्य, समान परंपरा, संस्कृती व इतिहास आणि भौगोलिक एकतेची भावना यांमुळे लोकांत राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होते.

लोकांमध्ये जेव्हा राष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न होते, तेव्हा ती भावना वाढत जाऊन तीव्र होते. म्हणजे त्यांना स्वत: चे राज्य असावे, स्वत:चा देश असावा, असे वाटू लागते व तेव्हा त्यातून राज्याची निर्मिती होते. त्यास ठरावीक भूप्रदेश असतो व तेथे राहणारे लोक असतात. त्यांचे शासन असते व त्यांस सार्वभौमत्व असते.

अशाप्रकारे विशिष्ट सीमांची मर्यादा असलेल्या भूप्रदेशात कायमस्थायी वसाहत करून राहणारा लोकसमुदाय ज्यावेळी सार्वभौम शासनाची निर्मिती करतो, तेव्हा त्यास ' राज्य ' (State) म्हणतात.

अशा प्रकारे राज्य म्हटल्यावर कमी अधिक क्षेत्रफळ असलेला प्रदेश, त्या प्रदेशावर कायमस्वरूपी वस्ती करून राहाणारा जनसमुदाय असतो. त्यांचे तेथे शासन (सरकार) असते आणि त्या शासनाकडे सार्वभौम सत्ता असते.

## राज्य व राष्ट्र यांमधील फरक:

राज्य व राष्ट्र या पूर्णतः वेगळ्या संकल्पना आहेत. या दोन्हीचे अर्थ भिन्न आहेत ; त्यामुळे दोन्हीमध्ये फरक आहे. हा फरक पुढील प्रमाणे आहे.

१) राज्याचे स्वरूप मूर्त असून, राष्ट्राचे स्वरूप अमूर्त आहे.

२) राज्याला निश्चित भूप्रदेश असतो, तसा राष्ट्राला असेलच असे नाही. राष्ट्राचा विस्तार राज्याबाहेरही असू शकतो.

३) राज्य ही भौतिक राजकीय संघटना आहे, तर राष्ट्र ही राज्य निर्मितीसाठी लोकांच्या मनात उत्पन्न झालेली ऐक्याची भावना आहे.

४) भूप्रदेश, लोकसमुदाय, शासन व सार्वभौमत्व हे राज्याचे ४ घटक आहेत, तर भाषा, वेश, धर्म, परंपरा, संस्कृति, इतिहास, भौगोलिक एकता हे राष्ट्राचे घटक आहेत.

५) राज्यनिर्मितीसाठी शासन व सार्वभौमत्व ह्या गोष्टी आवश्यक असतात, तर राष्ट्रनिर्मितीसाठी शासन व सार्वभौमत्व असलेच पाहिजे असे नाही. पारतंत्र्यातही राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होते किंवा निर्माण होऊ शकते.

६) राज्य ही सुसंघटित संस्था असते, तर राष्ट्र हे संघटित अथवा असंघटित असू शकते.

७) एका राज्यात एकापेक्षा जास्त राष्ट्रे असू शकतात. जसे, विघटनापूर्वी सो. रशिया अनेक राष्ट्रे होती. त्यातूनच वेगवेगळ्या घटकांनी आपले स्वतंत्र राज्य निर्माण केले. त्याचप्रमा एका राष्ट्रात एका पेक्षा जास्त राज्ये असू शकतात. जसे, युनायटेड अरब रिपब्लिकमध्ये आहेत.

८) सत्तेचा विचार करता, राज्याकडे दंडशक्ती असते. तशी दंडशक्ती राष्ट्राकडे नसते.

९) राज्याच्या निर्मितीस राष्ट्र ही भावना असलीच पाहिजे असे नाही. मात्र, राष्ट्रनिर्मितीत राष्ट्रीयत्वाची भावना आवश्यक असते.